फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ३६ वी बैठक

## दिनांक : ०८/१०/२००८

## - बैठकीचे कार्यवृत्त -


**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,**

**नागपूर - ४४० ००१**

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

## नियामक मंडळाच्या ३६ व्या बैठकीचे कार्यवृत्त व मंजूर ठराव

दिनांक ०८/१०/२००८ रोजी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ३६ वी बैठक मा.मंत्री, जलसंपदा (म.कृ.खो.वि.म.वगळून) व पदसिध्द अध्यक्ष, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली मा. मंत्रीमहोदयांचे मंत्रालयीन दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील प्रमाणे मा. मंत्री, सन्माननीय सदस्य तसेच शासनाचे संबंधित व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

(अ) **नियामक मंडळाचे सदस्य :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.ना.श्री. अजित पवार | : | मा.मंत्री,ज.सं.(म.कृ.खो.वि.म.वगळून) व पदसिध्द अध्यक्ष |
| २. | मा.ना.डॉ.सुनिल देशमुख | : | मा.राज्यमंत्री, ज.सं.(लाक्षेवि)व उपाध्यक्ष |
| ३. | मा.ना.श्री. रमेश बंग | : | उपाध्यक्ष, |
| ४. | मा.श्री.मधुकरराव किंमतकर | : | सदस्य |
| ५. | श्री. ए.बा.पाटील | : | सचिव |
| ६. | श्री.दे.प.शिर्के | : | कार्यकारी संचालक |

(ब) **नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी :-**

| | |
|---|---|
| १. | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी. |
| २. | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी श्रीमती मा.वि.कोकणे,सहसचिव |

(क) **निमंत्रित अधिकारी :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. म.वि.पाटील | : | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती |
| २. | श्री. सो.रा.सूर्यवंशी | : | मुख्य अभियंता, गो.प्र.,जलसंपदा विभाग, नागपूर |
| ३. | श्री. मो.ई.शेख | : | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर |
| ४. | श्री. दि.र. कंदी | : | मुख्य अभियंता, वि.प्र., जलसंपदा विभाग, अमरावती |

**(अजित पवार)**
**मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**(दे.प.शिर्के)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

## नियामक मंडळाची ३६ वी बैठक

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या ३६ व्या बैठकीस उपस्थित सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यकारी संचालक, वि.पा.वि.म.,नागपूर यांनी विषयसूचीचे वाचन केले. बैठकीचा कार्यवृत्तांत पुढील प्रमाणे आहे.

विषय क्रमांक : १

''नियामक मंडळाच्या ३५ व्या बैठकीचे ठराव वाचून कायम करणे.''

नियामक मंडळाची ३५ वी बैठक दिनांक २९.७.२००८ रोजी मा. मंत्री (जलसंपदा) तथा पदसिध्द अध्यक्ष, विपाविम, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात मुंबई येथे संपन्न झाली. बैठकीत पारीत झालेले ठराव खालीलप्रमाणे आहेत.

ठराव क्र.३५/३ :-

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाचा दहावा वार्षिक वित्तीय अहवाल वर्ष २००६-०७ यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.३५/८ :-

''ठराव करण्यात येतो की, विदर्भ प्रदेशातील माजी मालगुजारी तलावांची साठवण क्षमता वाढविणेसाठी यांत्रिकी संघटनेकडून गाळ काढणे व कालवा स्वच्छता कामासाठी नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्याचे प्रस्तावास, त्यासाठी लागणारा रु.३५९३.४२ लक्ष निधी महामंडळाकडे शिल्लक असलेल्या व्याजाचे रकमेतून देण्याचे अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''



**(अजित पवार)**
**मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**(दे.प.शिर्के)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

विषय क्रमांक २ :-

**''विदर्भ प्रदेशातील सहा जिल्हयामधील बांधकामाधीन सिंचन प्रकल्पांसाठी मा.पंतप्रधान महोदयांनी जाहीर केलेल्या पॅकेजबाबत सद्यःस्थिती.''**

विदर्भ प्रदेशातील सहा जिल्हयातील बांधकामाधीन सिंचन प्रकल्पांसाठी मा.पंतप्रधान महोदयांनी सिंचन प्रकल्पांच्या बांधकामासाठी व अतिरिक्त सिंचन क्षमता निर्मितीसाठी रु. २१७७ कोटीचे पॅकेज जाहीर केले आहे. यापैकी राज्यस्तरीय प्रकल्पांवर रु. २०८५ कोटी व स्थानिक स्तर प्रकल्पांवर रु. ९२ कोटी खर्च करुन पुढील तीन वर्षात सदर प्रकल्प पूर्ण करुन १५९२७५ हे. सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. असे कार्यकारी संचालक यांनी विदित केले.

सुरुवातीपासुन मार्च २००८ अखेर नियोजित एकूण रु २१७७.२१ कोटी खर्चापैकी रु ..१६८९.८४ कोटी खर्च झाला आहे. (७७.६१ टक्के) व वर्ष २००८-०९ मध्ये रु. ५३६.४४ कोटीचे नियोजन असून माहे ऑगस्ट - २००८ अखेर रु. ३११.०५ कोटी (५७.९८ टक्के) खर्च झालेला आहे तसेच पंतप्रधान पॅकेज मध्ये समाविष्ट प्रकल्पाद्वारे एकूण १५९२७५ हे. सिंचन क्षमता निर्माण करावयाची असून जून-२००८ अखेर ९७१६० हे. या उद्दिष्टाच्या अनुषंगाने ८९०५० हे. (९२ टक्के) सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. असे कार्यकारी संचालक यांनी सांगितले.

वरील प्रमाणे विदर्भ प्रदेशातील सहा जिल्हयातील पंतप्रधान पॅकेजमध्ये समाविष्ट बांधकामाधीन राज्यस्तरीय प्रकल्पांबाबत माहितीचे नियामक मंडळातर्फे अवलोकन करण्यांत आले.



**(अजित पवार)**
**मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

**(दे.प.शिर्के)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**